**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
दुरध्वनी क्र. : 0253-2461439 Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव : नियोजन शाखा संकलन : कुंभमेळा

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- नाशिक येथील मनपा, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि रेल्वेच्या जागांचे एकत्रित नियोजनाबाबत दिनांक 15 मार्च 2025 रोजी दुपारी 12:30 वाजता आयोजित केलेल्या ऑनलाइन बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन नाशिक येथील मनपा, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि रेल्वेच्या जागांचे एकत्रित नियोजनाबाबत मा. पदसिद्ध अतिरिक्त विकास आयुक्त, अध्यक्ष जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 15 मार्च 2025 रोजी दुपारी 12:30 वाजता ऑनलाइन बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व संबंधित कार्यान्वयीण यंत्रणांना निर्गमित करण्यात येवून इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधीत असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ही विनंती.

आपला विश्वासू,

सोबत. बैठकीचे इतिवृत्त.

Signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 21-03-2025 15:33:44
(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

बैठक (ऑनलाइन) दिनांक 15/3/2025 वेळ दु. 12.30 वा.

विषय – नाशिक येथील मनपा, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि रेल्वेच्या जागांचे एकत्रित नियोजन.

मा. मुख्य सचिव यांनी दिनांक 03/03/2025 रोजी घेतलेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दिनांक 15/03/2025 रोजी दु. 12.30 वा. नाशिक येथील नाशिक रेल्वे स्टेशन आणि त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि नाशिक महानगरपालिका यांच्या जागांबद्दल डॉ. प्रवीण गेडाम, पदसिद्ध अतिरिक्त विकास आयुक्त, अध्यक्ष जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस पुढील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

1. श्रीमती मनिषा खत्री, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
2. श्री. प्रदीप चौधरी, अतिरिक्त आयुक्त (शहर) नाशिक महानगरपालिका, नाशिक
3. श्री. रवि बागुल, उप अभियंता, नाशिक महानगरपालिका, नाशिक
4. श्री. अरुण सिया, विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक
5. श्री. विकास नागूलकर, जनरल मॅनेजर, महामेट्रो, नागपूर
6. श्री. प्रदीप शिंदे, प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक

बैठकीमध्ये रेल्वे विभागाने मागणी केलेल्या मनपा आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या जागेची चर्चा झाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने रेल्वे मंत्रालयाला सर्व प्रकारच्या वाहतूक व्यवस्थांसाठी एकत्रित मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्ट हब बनविण्याच्या प्रस्तावाबाबत देखील चर्चा झाली. सविस्तर चर्चा झाल्यानंतर पुढीलप्रमाणे ठरले.

| अ.क्र. | मा. अध्यक्षांनी दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| 1 | जागांचे हस्तांतरण आणि मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्ट हब हा विषय एकमेकांशी निगडीत असून मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्ट हब आराखडा दोन टप्प्यात बनवावा.<br>टप्पा 1. सिंहस्थ कुंभमेळा 2027 च्या नियोजनासाठी,<br>टप्पा 2. त्यापुढे दीर्घकालीन नियोजनासाठी | रेल्वे विभाग<br>महामेट्रो<br>नाशिक महानगरपालिका<br>MSRTC<br>प्रादेशिक परिवहन विभाग |
| | **टप्पा** 1-<br>सिंहस्थ कुंभमेळा 2027 च्या नियोजनासाठी – टप्पा 1 मध्ये विद्यमान रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म नं.4 च्या बाजूला होल्डींग एरिया आणि गर्दीची वाहतूक करणा-या सिटी बस, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसची एकत्रित व्यवस्था करुन त्यांना शहराच्या बाजूने आणण्यासाठी नाशिक- पुणे महामार्गाचा भाग असलेला उड्डाणपूल वापरावा. त्याचप्रमाणे मनपाच्या जागेकडून शहराच्या जागेकडे (प्लॅटफॉर्म नं.4 कडून प्लॅटफॉर्म नं.1) कडे येण्यासाठी अतिरिक्त मोठा | रेल्वे विभाग<br>नाशिक महानगरपालिका<br>MSRTC<br>प्रादेशिक परिवहन विभाग |

| अ.क्र. | मा. अध्यक्षांनी दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | रुंद एफओबी बांधावा जो की पुढे जावून टप्पा 2 मधील बांधकामाचा भाग होईल. त्याचप्रमाणे टप्पा 2 चे जे बांधकाम कुंभमेळा नियोजनाच्या दृष्टिने आडवे येणार नाही ते सुरु करावे. | |
| | **टप्पा** 2-<br>टप्पा 2 मध्ये रेल्वे समवेतच महामेट्रो, पुणे- नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे, सिटी बस आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस या सर्वांची स्थानके या मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट हब मध्ये राहतील याद्दष्टिने बांधकामाचा आराखडा तयार करावा. प्रवाशांना कमीत कमी चालावे लागेल आणि संपूर्ण ट्रान्सपोर्ट हब हे दिव्यांग, वृध्द अशा सर्व प्रकारच्या प्रवाशांसाठी अडथळा विरहीत राहील अशा पध्दतीचे नियोजन करावे.<br>वरील प्रमाणे नियोजन नाशिक महानगरपालिकेच्या वास्तुविशारद आणि अभियंता यांनी करावे आणि त्यांनी याबाबत वेळोवळी महामेट्रो आणि महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ यांच्याशी सपंर्कात राहून त्यांच्या गरजा ध्यानात घ्याव्यात व त्याचा समावेश आराखडयात करावा.<br>अशा प्रकारे आराखडा तयार केल्यानंतर रेल्वेला द्यावयाच्या जागांबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा. | रेल्वे विभाग<br>महामेट्रो<br>नाशिक महानगरपालिका<br>MSRTC<br>प्रादेशिक परिवहन विभाग |
| 2 | याचवेळी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या इतर बस स्थानकांची देखील चर्चा झाली. त्यावेळी असे सुचविण्यात आले की, नाशिक शहरातील अनेक छोटया छोटया बसस्थानकांऐवजी एक मोठे बसस्थानक बांधणे जास्त योग्य राहील आणि त्याकरता नाशिक महानगरपालिका जागा उपलब्ध करुन देवू शकतील. त्याप्रमाणे विभागीय नियंत्रक यांनी त्यांचे वरिष्ठांना कळवावे. | नाशिक महानगरपालिका<br>MSRTC |

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 19-03-2025 15:56:59

(डॉ. प्रवीण गेडाम)
पदसिद्ध अतिरिक्त विकास आयुक्त,
अध्यक्ष जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती
तथा विभागीय आयुक्त, नाशिक